जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUN 2018
तरुण भारत

# डॉ. मोरे यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

## चंदगडी भाषेस पुस्तकात स्थान दिल्याबद्दल गौरव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जागतिक किर्तीचे भाषातज्ञ डॉ. गणेश देवी संपादीत व संशोधीत भारतीय भाषांचे लोक सर्व्हेक्षण या पुस्तकामध्ये चंदगडी बोली भाषेस चौथे स्थान मिळाले आहे. हे पुस्तक आता जगभर प्रवास करणार असून जगभरातील भाषा अभ्यासकांना उपलब्ध झाले आहे. या पुस्तकासाठी चंदगडचे रहिवाशी व शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. नंदकुमार मोरे यांनी कष्ट घेतले. संशोधनात्मक माहिती संकलीत केली. यामुळे बडोदा येथील भाषा संस्थेतर्फे प्रकाशित बृहत सर्वेक्षण



**कोल्हापूर : डॉ. नंदकुमार मोरे यांचा शिवाजी विद्यापीठात सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे, संजय पवार, विजय देवणे.**

प्रकल्पात चंदगडी बोलीचा प्रादेशिक भाषा म्हणून समावेश करण्यात आला. तसेच शासन स्तरावर भाषेला अधिकृत मान्यता देण्यात आली. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केलेल्या या कार्याचा शिवसेनेच्या वतीने गौरव करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या दालनामध्ये नंदकुमार मोरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संजय पवार, विजय देवणे, रवि चौगुले आदि उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUN 2018
महाराष्ट्र टाइम्स



# प्रा. नंदकुमार मोरे यांचा सत्कार

**कोल्हापूर :** जागतिक कीर्तीचे भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी संशोधित व संपादित केलेल्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या पुस्तकात मराठी भाषा क्रमवारीत चंदगड बोलीला चौथे स्थान मिळाले आहे. या पुस्तकाच्या निर्मितीत योगदान दिल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रा. नंदकुमार मोरे यांचा शिवसेनेच्यावतीने सत्कार केला. त्यांचा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या पुस्तकाच्या निमित्ताने चंदगडी भाषा जागतिक स्तरावर पोहोचली असून, मराठीतील महत्त्वाची प्रादेशिक भाषा म्हणून ओळख मिळाली असल्याचे प्रा. मोरे यांनी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार, विजय देवणे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
15 JUN 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या बृहत् आराखड्यासाठी ॲप

**कोल्हापूर, ता. १४ :** शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत् आराखडा तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी विशेष ॲप कार्यान्वित केले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम आणि राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या सूचनेनुसार हे काम सुरू आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील परिसरांची भौगोलिक, सामाजिक तसेच आर्थिक गरज जाणून त्या त्या ठिकाणी नव्या विषयांचे अभ्यासक्रम, महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्र, सॅटेलाईट केंद्र यांच्या मदतीने बृहत आराखड्यात तरतुदी होणार आहेत. त्यासाठी शास्त्रोक्त सर्वेक्षणाचा कार्यक्रम विद्यापीठाने सुरू केला आहे.

सर्वेक्षण करण्यासाठी विद्यापीठाद्वारे SUK PP १९ या नावाचे मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर 'बृहत् आराखडा : शास्त्रीय सर्वेक्षणाच्या प्रश्नावली' या नावाने वेबलिंक उपलब्ध आहे. मोबाईल आणि वेबलिंकवर सर्व बारा घटकांसाठी स्वतंत्रपणे विविध घटकनिहाय प्रश्नावली उपलब्ध असून बहुपर्यायी उत्तरे देखील उपलब्ध आहेत. सर्वेक्षण प्रक्रियाही बुधवारी (ता. १३) सुरू झाली आहे. येत्या २० जून या कालावधीमध्ये मोबाईल व वेबलिंकवर उपलब्ध असणार आहे. मोबाईल अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरील वेबलिंकद्वारे लागू असणाऱ्या प्रश्नावलीमध्ये योग्य ती माहिती भरून या सर्वेक्षणामध्ये यशस्वी सहभाग नोंदवावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

15 JUN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे आराखड्यासाठी 'ॲप'

## सर्वेक्षणाची प्रक्रिया सुरु; स्वतंत्रपणे विविध प्रश्नावली उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याचे काम सध्या सुरु आहे. त्यासाठीच्या सर्वेक्षणाच्या प्रक्रियेकरिता विद्यापीठाने 'एसयुकेपीपी-१९' या नावाने मोबाईल ॲप तयार केले आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध परिसरांची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक निकड जाणून घेऊन संबंधित ठिकाणांच्या आवश्यकतेनुसार त्या-त्या ठिकाणी नवे विषय, अभ्यासक्रम, महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्र, सॅटेलाईट केंद्र यांच्यासाठी बृहत आराखडयामध्ये तरतूद करणे जरुरीचे आहे. याकरिता या विशिष्ट ठिकाणे, परिसराची माहिती करून घेणेकरिता बरील अधिनियमांतील तरतुदीनुसार शास्त्रोक्त सर्वेक्षणाचा कार्यक्रम विद्यापीठाने सुरु केला आहे. हे सर्वेक्षण करण्यासाठी विद्यापीठाने 'एसयुकेपीपी-१९' हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. ते गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील मुख्यपृष्ठावर 'बृहत आराखडा : शास्त्रीय सर्वेक्षणाच्या प्रश्नावली' या नावाने वेबलिंक उपलब्ध केली आहे. मोबाईल ॲप आणि वेबलिंकवर सर्व बारा घटकांसाठी स्वतंत्रपणे विविध प्रश्नावल्या उपलब्ध केल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
15 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

## विद्यापीठातील नव्या पदभरतीला मंजुरी

**कोल्हापूर :** येत्या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठातील एमबीए युनिटद्वारे ई बिझनेसमध्ये पदव्युत्तर पदविका, दूरशिक्षण केंद्रांतर्गत बीए होमसायन्स या अभ्यासक्रमांसह नीम अंतर्गत पदभरतीला मान्यता आली. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी परिषदेतील मांडण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी सात विषयांना मान्यता देण्यात आली. परिषदेत येत्या शैक्षणिक वर्षातील नवे अभ्यासक्रम, सामंजस्य कराराचे नूतनीकरण याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी परदेशी विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याबाबतच्या नियमावलीस मान्यता देण्यात आली. बैठकीस प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUN 2018
लोकमत

# एम. ए., एम. कॉम.ची अंतिम गुणवत्ता यादी २२ जूनला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम.ए., एम.कॉम., एलएल.एम., एम. एससी. टेक., गणित आणि एम. सी. ए. (विज्ञान) या अभ्यासक्रमांच्या भाग एकच्या प्रवेशाचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. प्रवेश प्रक्रियेत अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिद्धी दि. २२ जूनला होणार आहे.

या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेतील तात्पुरती गुणवत्ता यादी दि. १८ जूनला प्रसिद्ध होणार असून, त्यावर हरकती नोंदविण्याची मुदत २१ जूनपर्यंत आहे. अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिद्धी २२ जूनला होईल. पहिल्या फेरीसाठीच्या जागांची घोषणा २६ जूनला होणार असून, त्याच्या दुसऱ्या दिवशी प्रवेश निश्चित करावयाचे आहेत. दुसऱ्या फेरीसाठी असणाऱ्या जागांची घोषणा २९ जूनला होईल. त्यानंतर प्रवेश निश्चितीची मुदत ३० जून आहे. तिसऱ्या फेरीतील जागांची घोषणा दि. ३ जुलै रोजी असून, तिच्या दुसऱ्या दिवशी प्रवेश निश्चित करण्याची मुदत आहे. या प्रक्रियेची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
15 JUN 2018
पुढारी

शिवाजी विद्यापीठ प्रवेश प्रक्रिया

# अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची पहिली फेरी सोमवारपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए, एम.कॉम., एल.एल.एम., एम.एस्सी, टेक, गणित व एमसीए (सायन्स) भाग-१ अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची पहिली फेरी सोमवारपासून (दि.१८) पासून सुरू होत आहे. गुणवत्ता यादी आणि उपलब्ध जागा जाहीर केल्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होईल.

तीन फेऱ्यांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. ४ जुलैपर्यंत ही प्रक्रिया असणार आहे. विद्यार्थ्यांना याबाबत सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JUN 2018
लोकमत

जैवविविधतेच्या सुरक्षिततेसाठी जनजागृतीचा उपाय

# दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन, नवसंशोधनाची गरज

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयाने इ. के. जानकी अम्मल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्याबद्दल डॉ. यादव यांच्याशी साधलेला थेट संवाद...



डॉ. एस. आर. यादव

**प्रश्न :** संशोधनातील आपली कारकीर्द कशी राहिली आहे?

**उत्तर :** माझा जन्म साईकडे (ता. पाटण) या खेडेगावामधील शेतकरी कुटुंबातील. पदवीपर्यंतचे शिक्षण सायन्स कॉलेज (कऱ्हाड) येथे झाले. पदव्युत्तर शिक्षण हे मुंबईतील रुईया महाविद्यालयात घेतले. त्यानंतर डॉ. ए. आर. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मी संशोधन सुरु केले. माझ्या संशोधनाचा श्रीगणेशा हा खंडूआईच्या पठारावरील 'वायतुरा' या वनस्पतीद्वारे झाला. दिवसेंदिवस माझ्या पश्चिम घाटातील भ्रमंती, वृक्षसंपदेबाबतच्या कुतूहलामुळे संशोधनात, नवीन वनस्पतींची नावे, त्यांच्या शोधामध्ये भर पडत गेली. प्रामुख्याने पृथ्वीच्या पृष्ठभागाची हालचाल होत आहे हे दर्शविणाऱ्या वनस्पती कोकणातील वैभववाडी, केरळमधील पेरिया या गावात मिळाल्या. माझ्या संशोधनातील प्रवासात जुन्नरच्या टेकड्यांवर सर्वांत जास्त 'एलडोपा' असणारी, कंपवातावर उपयुक्त ठरणारी खाजखुजलीची नवीन प्रज़ाती निदर्शनास आली. जैतापूरच्या प्रकल्पाजवळ साखरकोंबे येथे पाच प्रकारच्या नवीन प्रजाती मिळाल्या. सफेद मुसळीच्या नवीन प्रजाती आणि रत्नागिरीजवळ 'कॉल्चीसिन' असणारे छोटीशी प्रजाती शोधण्यात यश मिळाले. पश्चिम घाटातील नवीन प्रजातींचा शोध, त्यांचा अभ्यास, त्यांचे संरक्षण, संवर्धन, आदी स्वरुपात सन १९८५ पासून मी कार्यरत आहे.

**प्रश्न :** शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील आपले योगदान कसे राहिले?

**उत्तर :** प्राध्यापक, विभागप्रमुख म्हणून कार्यरत असताना या विभागातील संशोधनाद्वारे शिवाजी विद्यापीठाची जगभरात ओळख निर्माण केली. सपुष्प आवृत्तबीजी वनस्पतींच्या एकूण ५८ प्रजाती शोधल्या आहेत. त्यांच्या संवर्धनाचे काम विद्यापीठात साकारलेल्या देशातील पहिल्या लीड बॉटनिकल गार्डनमध्ये सुरु आहे. जागतिक मान्यतेचे पादपालय, प्रदेशनिष्ठ वृक्षांचे वृक्षालय विकसित केले.

थेट संवाद

नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या वीस प्रदेशनिष्ठ वनस्पतींचे संवर्धन केले. नारळवर्गीय वनस्पतींच्या ८५ प्रजाती संवर्धित करून त्याचे उद्यान तयार केले आहे. आजपर्यंत दोनशेहून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. आठ संशोधनात्मक ग्रंथ लिहिले असून, त्यातील 'फ्लोरा ऑफ कोल्हापूर डिस्ट्रीक्ट', 'फ्लॉवर्स ऑफ सह्याद्री ग्रासेस ऑफ महाराष्ट्र' हे ग्रंथ वनस्पती वर्गीकरणासाठी उपयुक्त आहेत. वर्गीकरण अणि वनस्पती गुणसूत्रे यावर विशेष संशोधन केले आहे.

**प्रश्न :** पश्चिम घाटातील वनस्पतींची सुरक्षितता, संवर्धनासाठी काय करता येईल?

**उत्तर :** पश्चिम घाटातील पाच टक्के जमिनीवर २७ टक्के जैवविविधता आहे. त्यांची सुरक्षितता त्याच भागात राहणाऱ्या लोकांच्या हातात आहे. त्यामुळे जनजागृती करणे हाच एक उपाय आहे. या घाटात कोणतीही विकासाची कामे घेऊ नयेत. विद्यापीठ, महाविद्यालयांनी नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या वनस्पतींचे पुनर्विस्थापना करावे. या घाटाचा परिसर संवेदनशील विभाग म्हणून आरक्षित करणे आवश्यक आहे. तेथील सर्व वनस्पतींच्या बिया जमा करुन, त्यांची रोपे करुन शाळा, महाविद्यालये, वनविभागांना शिवाजी विद्यापीठाद्वारे दिली जात आहेत. जेणेकरुन त्यांचे संवर्धन होईल.

**प्रश्न :** वनस्पती शास्त्रामध्ये आपल्याला आणखी काय करायचे आहे?

**उत्तर :** शिवाजी विद्यापीठातील 'लीड बॉटनिकल गार्डन'ची आंतरराष्ट्रीय नेटवर्कमध्ये त्याची नोंदणी करावयाची आहे. या गार्डनचे संकेतस्थळ केले जाणार आहे. विद्यापीठातील स्कूल ऑफ टेक्सोनॉमी (वनस्पती वर्गीकरण) जगभरात ओळख निर्माण करायची आहे. देशीय वनस्पतींच्या बिया जमा करून, त्यांची रोपे तयार करून ती पुढील संवर्धनासाठी शाळा, महाविद्यालये, शेतकरी, वनविभागांना देणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या परिसरात जैवविविधता पार्कमध्ये रूपांतरित करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. महाराष्ट्रातील वनस्पतींची सचित्र माहिती देणारा मराठी भाषेतील ग्रंथ प्रकाशित करण्याचे नियोजन आहे. वनस्पती शास्त्रातील मूलभूत संशोधनामध्ये मी अजून काम करणार आहे.

**प्रश्न :** संशोधक, अभ्यासकांना काय सांगाल?

**उत्तर :** मानवाच्या आहार, आरोग्य व निवारा या मूलभूत गरजा वनस्पतींच्या माध्यमातून पूर्ण होतात. २१व्या शतकामध्ये वनस्पतींचे महत्त्व अधिक वाढणार आहे. देशातील विविध प्रजातींच्या, दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन आणि त्यानुषंगाने नवसंशोधन करण्यासाठी वनस्पतीशास्त्रातील अभ्यास, संशोधकांनी झोकून देऊन कार्यरत राहावे. वनस्पतींचे विविध औषधी उपयोग, वापर करण्याच्या दृष्टीने त्यांनी संशोधन करावे. वनस्पती शास्त्रामध्ये त्यांनी संवेदनशीलपणाने कार्यरत राहावे.

-संतोष मिठारी